# <u>प्रेसनोट</u>

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्रं. 142/2024 दिनांक :18.04.2024

## 1)घरफोडी :–

**मुखेड :–** दिनांक 17.04.2024 रोजी चे 00.00 ते 05.00 चे दरम्यान, **फिर्यादीचे राहाते घरून नाईकनगर मुखेड ता. मुखेड जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी हा घरात गर्मी होत असल्याने दार उघडे ठेवुन घरासमोर अंगणात झोपला असता अज्ञात आरोपीने घरात प्रवेश करून घरात चार्जिंगला लावलेले चार मोबाईल किंमती 18,000/–रू चे व कपाटातील नगदी 10,000/–रू तसेच सोन्या चांदीचे जुने वापरते दागीने 20,000/–रू असा एकुण 48,000/–रू मुद्येमाल चोरून नेला. वगैरे **फिर्यादी सुखदेव श्रीहरी देवकर, वय 40 वर्षे, व्यवसाय मॅकॅनिक रा. नाईकनगर मुखेड ता. मुखेड जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुखेड** गुरनं 129/2024 कलम 457, 380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2223 कदम, मो. नं. 8390695468** हे करीत आहेत.

## 2)चोरी :–

**1)माहुर :–** दिनांक 17.04.2024 रोजी चे 08.00 वा. चे सुमारास, **पैनगंगा नदी काठावर माहुर ता. माहुर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी ही कुटूंबासह पैनगंगा नदी पात्रात अंघोळ करीत असतांना नदी काठावर ठेवलेली बॅग ज्यात सोन्याचे दागीने पाच तोळे एक ग्राम किंमती 2,55,000/–रूपये असलेली कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी सौ. नेहा अजयसिंग चव्हाण, वय 22 वर्षे, व्यवसाय घरकाम रा. संजय नगर ता. जि. आदिलाबाद** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे माहुर** गुरनं 50/2024 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री वाठोरे, मो.क्रं. 9257961335** हे करीत आहेत.

**2)नांदेड ग्रामीण :–** दिनांक 16.04.2024 रोजी चे 12.00 ते 14.30 वा. चे दरम्यान, **अदनान गार्डन धनेगाव ता. जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी हे त्यांचे नातेवाईकाकडे ईद सनानिमित्त भेटीसाठी जात असतांना गडबडीत घराचे दाराला कुलूप लावण्याचे विसरल्याने दार उघडे दिसल्याने कोणीतरी अज्ञात चोरटयाने घरात जावुन घरातील कपाटाचा लोखंडी रॉडने दरवाजा तोडुन कपाटातील लॉकरमधील ठेवलेले 1,60,000/–रू रोख रक्कम चोरून नेली. वगैरे **फिर्यादी मोहमद खालेद पि. मोहमद खलील, वय 36 वर्षे, व्यवसाय मेकॅनिक रा. अदनान गार्डन धनेगांव ता. जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 313/2024 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री जामोदकर, मो.क्रं. 9923895077** हे करीत आहेत.

## 3)मो. सा. चोरी :–

**नांदेड ग्रामीण :–** दिनांक 14.04.2024 रोजी चे 20.00 ते दिनांक 15.04.2024 चे 06.00 वा. चे दरम्यान, **मोसंबीचा मळा खुदबेनगर नांदेड येथे,** यातील फिर्यादीचे युनिकॉर्न कंपणची मोटार सायकल क्रमांक एमएच–26/सीके–3663 किंमती 1,50,000/–रूपयाची नमुद ठिकाणावरून कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी शेख निसार शेख अहेमद, वय 30 वर्षे, व्यवसाय मिस्त्री काम रा. मोसंबीमळा खुदबेनगर नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 316/2024 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री कदम, मो.क्रं. 9284351496** हे करीत आहेत.

## 4)गंभीर दुखापत :–

**भाग्यनगर :–**दिनांक 17.04.2024 रोजी चे 14.00 वा. चे सुमारास, **स्वागत बार समोर छत्रपती चौक नांदेड येथे,** यातील फिर्यादी हा स्वागत बार समोर छत्रपती चौक नांदेड येथे आंबे घेण्यासाठी आला असता आंबेवाल्यास बोलत असतांना आंबेवाला मालक फिर्यादीस म्हणाला की तु आंब्याला हात का लावला असे म्हणत असतांना तेथे यातील आरोपी हा आला व त्याने फिर्यादीस म्हणाला की, तु लई हुशारी करायलास का म्हणुन त्याचे मोटार सायकलचा रॉड काढुन उजव्या हातावर मारून हाड फॅक्चर करून गंभीर दुखापत केली. वगैरे **फिर्यादी राहुल हरिचंद्र कांबळे, वय 40 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. एकतानगर वाडी (बु.) ता. जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं 163/2024 कलम 325, भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2252 तोडसाम, मो. नं. 7720839111** हे करीत आहेत.

## 5)विवाहीतेचा छळ :—

**मुखेड :—** दिनांक 29.11.2020 चे नंतर सहा महीन्यापासुन ते दिनांक 01.02.2024 चे दरम्यान, **फिर्यादीचे सासरी हंगरगा ता. नायगांव ह. मु. गौतमनगर मुखेड ता. मुखेड जि. नांदेड येथे,** यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस तु दिसायला चांगली नाहीस, काळी आहेस, असे म्हणुन उपाशी पोटी ठेवुन व तुझे माहेरहुन घर बांधण्यासाठी व फायनान्स साठी एक लाख रूपये घेवुन ये म्हणुन शिवीगाळ करून तु जर माहेरहुन पैसे आणले नाहीस तर तुला खतम करतो अशी जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 26 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुखेड** गुरनं 131/2024 कलम 498(अ), 323, 504, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2223 कदम, मो. क्रं. 8390695468** हे करीत आहेत.

## 6)फसवणुक :—

**1)मुखेड** :— दिनांक 17.04.2024 रोजी चे 08.30 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे घरी मौ. उच्चा बु. ता. मुखेड जि. नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीचे घरी येऊन भिक्षा मागण्याचा बहाना करून फिर्यादीचे कानातील सोन्याचे एक ग्रॅम वजनाचे दोन फुल किंमती चार हजार रूपयाचे मंत्रुन देतो म्हणुन म्हणाल्याने फिर्यादीने काढुन दिल्याने त्यांनी मंत्रुन फिर्यादीस सोन्याचे फुलांची पुडी न देता दुसरी काळया मण्याची पुडी फिर्यादीच्या हाता देऊन फसवणुक केली. वगैरे **फिर्यादी सौ. कावेरी भ्र. बस्वराज मकणे, वय 23 वर्षे, व्यवसाय घरकाम रा. उच्चा बु. ता. मुखेड जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुखेड** गुरनं. 130/2024 कलम 420, 34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/2636 चिंचोरे, मो.नं. 9923192636** हे करीत आहेत.

**2)भाग्यनगर** :— दिनांक 08.04.2024 ते 12.04.2024 चे दरम्यान, फिर्यादीचे राहाते घरी **ऑनलाईन हॉटेल रेटींग्ज व क्रिप्टो ग्लोब या साईट वरून, मु. पो. खरोसा ता. औसा जि. लातुर येथे,** यातील नमुद आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी हे तिचे सासरी मु. पो. खरोसा ता. औसा जि. लातुर येथे तिचे सासर घरी असतांना यातील महिला नामे माया, नेहा, ध्वीन, सौमाल्या, शर्वीना यांनी हॉटेल रेटींग्जचा व क्रिप्टो ग्लोब या साईटवर शेअरींग इकॉनॉमीचा टास्क केल्यानंतर तुम्हाला तुम्ही गुंतविलेल्या रक्कमेवर कमीशन मिळेल असे अमिश दाखवुन कमी रक्कमेवर कमीशन देऊन फिर्यादीचा विश्वास संपादन करून 5,000/—रूपये, 55,000/—रूपये, 1,96,000/—रूपये अशी एकुण 2,56,000/—रूपये अशी रक्कम भरण्याचा टास्क देऊन, टास्क पुर्ण केल्यानंतर टास्क चुकला आहे असे सांगुन फिर्यादीने गुंतविलेली रक्कम व कमिशन परत न करता फिर्यादीची ऑनलाईन संपर्क करून फसवणुक केली. वगैरे **फिर्यादी अंकिता सुधाकर महाजन, वय 30 वर्षे, व्यवसाय शाखा अभियंता, सरकारी नौकरी, रा. अनुराधा रो हाऊस, प्रेमनगर बोर्डसमोर, जैन मंदीर, मालेगांव रोड नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं. 162/2024 कलम 420, 34 भादवि सह कलम 66(ड), आयटी ॲक्ट कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोनि/श्री वाघ, मो.नं. 9324546300** हे करीत आहेत.

## 7)भारतीय हत्यार कायदा :—

**शिवाजीनगर :—**दिनांक 17.04.2024 रोजी चे 18.20 वा. चे सुमारास, **अलीभाई टॉवर समोर शिवाजीनगर सार्वजनिक रोडवर नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकादेशीररीत्या आपले ताब्यात लोखंडी धारदार तलवार बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोउपनि/श्री मिलींद मधुकर सोनकांबळे, ने. पोस्टे शिवाजीनगर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं 140/2024 कलम 4/25 भारतीय हत्यार कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/43 पाटील, मो.क्रं. 8805013616** हे करीत आहेत.

## 8)शासकीय आदेशाचे उल्लंघन :—

**1)भाग्यनगर :—**दिनांक 14.04.2024 रोजी चे 19.38 वा. चे सुमारास, **वर्कशॉप कॉर्नर सार्वजनिक रोडवर नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त भिमजयंती मंडळ मंगलकार्यालय जवळ नांदेड मिरवणुकीमध्ये डिजे साऊंड सिस्टीम मोठया क्षमतेच्या ध्वनी प्रक्षेपण यंत्राचा वापर करून ध्वनी प्रदुषण करून शासनाचे आदेशाचे उल्लंघन केले. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/1098 गजानन दिगांबर किडे, ने. पोस्टे भाग्यनगर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं 161/2024 कलम 188, भादवि सह कलम 15, 19 पर्यावरण संरक्षण कायदा, सह नियंत्रण कलम 5, 6 सह कलम 33 एस/138, 136 म.पो.का कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2252 तोडसाम, मो.क्रं. 7720839111** हे करीत आहेत.

**2)हदगांव :–**दिनांक 17.04.2024 रोजी चे 17.30 ते 21.00 वा. चे दरम्यान, **हदगांव शहरात ता. हदगांव जि. नांदेड येथे,** यातील नमुद पाच आरोपीतांनी संगणमत करून वाहन क्रमांक एमएच–26/एच–7431 वर डिजे बसवुन ध्वनीक्षेपाचा वापर करून श्रीराम नवमी निमित्त मिरवणुक काढुन शासकीय आदेशाचे उल्लंघन केले. वगैरे **फिर्यादी पोनि/श्री जगन गणपती पवार, ने. पोस्टे हदगांव** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे हदगांव** गुरनं 111/2024 कलम 188, भादवि सह कलम 15, पर्यावरण संरक्षण कायदा, प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2938 जुडे, मो.क्रं. 7620215669** हे करीत आहेत.

**3)हदगांव :–**दिनांक 17.04.2024 रोजी चे 17.30 ते 21.00 वा. चे दरम्यान, **हदगांव शहरात ता. हदगांव जि. नांदेड येथे,** यातील नमुद पाच आरोपीतांनी संगणमत करून वाहन क्रमांक एमएच–26/सीई–0208 वर डिजे बसवुन ध्वनीक्षेपाचा वापर करून श्रीराम नवमी निमित्त मिरवणुक काढुन शासकीय आदेशाचे उल्लंघन केले. वगैरे **फिर्यादी पोनि/श्री जगन गणपती पवार, ने. पोस्टे हदगांव** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे हदगांव** गुरनं 112/2024 कलम 188, भादवि सह कलम 15, पर्यावरण संरक्षण कायदा, प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/35 चिंतले, मो.क्रं. 7620215669** हे करीत आहेत.

## 9)जुगार :–

**नांदेड ग्रामीण :–** दिनांक 17.04.2024 रोजी चे 16.30 वा. चे सुमारास, **देगलुर नाका ममता कॉलनी सी टी धाबयाचे पाठीमागे मोकळया जागेत ता. जि. नांदेड येथे,** यातील नमुद बारा आरोपीतांनी बिना परवाना बेकादेशीररीत्या झन्ना मन्ना नावाचा जुगार खेळत व खेळवीत असतांना नगदी 7170/–रू व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/2282 शेख ईब्राहीम शेख ईसमाईल, ने. पोस्टे नांदेड ग्रामीण** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 314/2024 कलम 12 (अ) म.जु.का. प्रमाणे गुन्हा दाखल असुन **पोहेकॉ/173 माने, मो.नं. 8788371187** हे करीत आहेत.

## 10)प्रोव्हिबीशन :–

**देगलुर :–** दिनांक 17.04.2024 रोजी चे 14.40 वा. चे सुमारास, **आलुर येथे बसस्थानक जवळ रोडच्या कडेला मौ. आलुर ता. देगलुर जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारू भिंगरी संत्रा किंमती 1540/–रूपयाची चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी सपोनि/श्री आप्पासाहेब ज्ञानोबा जगताप, ने. पोस्टे देगलुर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे देगलुर** गुरनं 8/2024 कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1984 सकनुरे, मो.नं. 9552186602** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड